GIS Implementation in MGNREGA
राज्यस्तरीय GIS WORKING GROUP
समिती स्थापन करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग (रोहयो प्रभाग),
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
शासन निर्णय क्र. मग्रारोहयो/निवि/२०१६-१७/प्र.क्र.२३/रोहयो-९,
दि. १० ऑक्टोबर, २०१६

**वाचा :** केंद्र शासनाचे पत्र क्र.M-११०११/०२/२०१६-RE-III, **दिनांक** २७ जून, २०१६

केंद्र शासनाने GIS Implementation in MGNREGA बाबत ठरविलेल्या कार्यपध्दतीनुसार मा.सचिव (रोहयो) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय GIS WORKING GROUP समिती स्थापन करण्याबाबतच्या केंद्र शासनाच्या सूचना आहेत. त्या अनुषंगाने राज्यस्तरीय GIS WORKING GROUP समिती स्थापन करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

## शासन निर्णय :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत राज्यात पुर्ण झालेल्या कामांचे भौगोलिक माहिती प्रणाली आधारीत मत्तांचे मॅपिंग (GIS Based Assets Mapping) करण्यात येते. केंद्र शासनाच्या निदेशानुसार नियोजन (रोहयो) विभागाची खालील प्रमाणे राज्यस्तरीय GIS WORKING GROUP समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. सचिव, रोहयो विभाग | अध्यक्ष |
| २. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर | सदस्य सचिव |
| ३. उप सचिव, (रोहयो) | सदस्य |
| ४. उपसचिव (ग्रामविकास विभाग) | सदस्य |
| ५. उपायुक्त (कोकण विभाग) | सदस्य |
| ६. SGNO (State GIS Nodal Officer) | सदस्य |
| ७. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नाशिक विभाग) | सदस्य |
| ८. DGNO (District GIS Nodal Officer), ठाणे | सदस्य |
| ९. जिल्हा एम.आय.एस. समन्वयक, पालघर | सदस्य |

(२) GIS WORKING GROUP **समितीची कार्ये**

१. क्रमबद्ध धोरण निश्चित करणे.
२. जिल्हाधिकारी / DM DGNO (District GIS Nodal Officer) व राज्यातील इतर अधिकारी यांच्यासमवेत बैठकीचे आयोजन करणे.
३. अंमलबजावणीच्या प्रगतीचा आढावा घेणे.
४. क्षेत्रिय स्तरावर उद्भवलेल्या प्रश्नांसंदर्भात निराकरण करणे.
५. छायाचित्रांच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवणे.
६. व्यवस्था आणि मत्तांची निर्मिती, Geo-tagging संबंधित मुद्दे याबाबतचा तपशिल पोर्टलवर प्रकाशित करणे.
७. GIS WORKING GROUP च्या बैठकीचा कामकाज अहवाल कार्यक्रम विभाग, MGNREGA यांचेकडे केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास विभागाने मागणी केल्यावर सादर करणे.
८. प्रशिक्षण शेड्यूल आढावा घेऊन त्यात सुधारणाबाबत सूचना करणे.
९. समिती दरमहा किंवा वारंवार अध्यक्ष ठरवतील त्याप्रमाणे बैठकांचे आयोजन करेल, त्यास SGNO (State GIS Nodal Officer) सचिवस्तरीय समर्थन प्रदान करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६१०१०१६२४४७४९१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्रमोद शिंदे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. सचिव, रोहयो व जलसंधारण विभाग यांचे स्वीय्य सहाय्यक.
२. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर.
३. उप सचिव (रोहयो) यांचे स्वीय्य सहाय्यक.
४. उपसचिव (ग्रामविकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
५. उपायुक्त (कोकण विभाग), विभागीय आयुक्तालय, कोकण भवन, नवी मुंबई.
६. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नाशिक विभाग), विभागीय आयुक्तालय, नाशिक.
७. SGNO (State GIS Nodal Officer), महाराष्ट्र.
८. DGNO (District GIS Nodal Officer), ठाणे.
९. जिल्हा एम.आय.एस. समन्वयक, पालघर.
१०. निवडनस्ती.